**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर-४४० ००१
ई-मेल-apccfhrmadmn@gmail.com दुरध्वनी ०७१२-२५५६७९२, फॅक्स- ०७१२-२५५०६७५

महत्वाचे

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.८१(१६-१७)/722
नागपूर ४४०००१, दिनांक 3/9/16

**विषय :-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक व पदोन्नत वनपाल यांना राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागु न करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन, वित्त विभाग निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा ३, दिनांक ०१/०४/२०१०.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र. /६८२, दिनांक १३/०८/२०१५.
३) शासन, वित्त विभाग शुध्दीपत्रक क्र. आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दिनांक २३/१२/२०१५.
४) शासन, महसूल व वनविभाग पत्र क्र. एफएसटी-०४/१६/प्र.क्र.१२७/फ-४, दिनांक ०६/०५/२०१६.

प्रस्तुत प्रकरणी जे वनरक्षक / पदोन्नत वनपाल हे माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नाहीत, त्यांना २४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेतंर्गत दिलेला दुसरा लाभ काढून घेण्यात यावा व या लाभापोटी झालेल्या अतिपदानाची वसूली संबंधित वनरक्षक / पदोन्नत वनपाल यांचेकडून करण्यात यावी, अशा सुचना या कार्यालयाचे संदर्भ २ वरील पत्र दिनांक १३/०८/२०१५ अन्वये सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना दिलेल्या आहेत.

२.० त्यानंतर संदर्भ १ वरील शासन निर्णय दिनांक ०१/०४/२०१० चे अनुषंगाने शासन, वित्त विभागाकडील दि.२३/१२/२०१५ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे. (प्रत संलग्न).सदर शुध्दीपत्रकात दिनांक ०१/०४/२०१० चे शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ ऐवजी खालीलप्रमाणे वाचणेस असे कळविले आहे.

> **“या योजनेखाली पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही. हे शुध्दीपत्रक या आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल.”**

३.० तसेच मुळ अर्ज क्र. १९४/२०१६ (श्री. सी.जे. कांबळे व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) या प्रकरणात मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

यांना उद्देशून असलेल्या शासनाचे पत्र क्र. एफएसटी-०४/१६/प्र.क्र.१२७/फ-४, दिनांक ०६/०५/२०१६ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे. (प्रत संलग्न).

> **"वित्त विभागाच्या शुध्दीपत्रकाप्रमाणे (दिनांक २३/१२/२०१५) तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वसूली करता येत नाही, मात्र दिलेले लाभ काढून घेता येतील.**
>
> **वित्त विभागाच्या उपरोक्त अभिप्रायानुसार प्रस्तुत प्रकरणी याचिकाकर्त्याकडून वसूली करण्यात येऊ नये, असे संबंधितांना निर्देश देण्यात येत आहे."**

४.० शासन शुध्दीपत्रक दिनांक २३/१२/२०१५ मधील तरतूदी विचारात घेता या कार्यालयाचे संदर्भ २ वरील पत्र दिनांक १३/०८/२०१५ याद्वारे रद्द करण्यात येत आहे. तरी या प्रकरणी शासन, वित्त विभाग शुध्दीपत्रक दिनांक २३/१२/२०१५ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे.

५.० उपरोक्त विषयाबाबत अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवले आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात दिनांक २३/१२/२०१५ चे शासन शुध्दीपत्रकाप्रमाणे कार्यवाही होत असल्याचे मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून द्यावे व तसे प्रकरणनिहाय या कार्यालयास कळविण्यात यावे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

(डॉ. दिलीप सिंह)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन- दुय्यम संवर्ग)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**प्रति,**
**मुख्य वनसंरक्षक** (प्रा.) (सर्व)

**प्रतिलिपी :** सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीकरीता सादर.

स्वा/-
(डॉ. दिलीप सिंह)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन- दुय्यम संवर्ग)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या लाभाची वसूली करण्यात येवू नये याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः आप्रयो- १०१५ /प्र.क्र. १११ /२०१५/सेवा- ३
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : २३ डिसेंबर, २०१५.

वाचा

१) शासन निर्णय क्रमांक : सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र. १/९५/बारा, दिनांक ८ जून १९९५.
२) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जूलै, २००१
३) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक १ एप्रिल, २०१०

प्रस्तावना -

तत्कालीन कालबध्द पदोन्नती योजनेंतर्गत पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसूली केली जाणार नाही असे संदर्भ क्र.१ येथील दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयात नमूद केले आहे. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही असे संदर्भ क्र.२ येथील दिनांक २० जुलै, २००१ च्या शासन निर्णयात नमूद केले आहे. मात्र सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पहिला /दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील तसेच अशा लाभांची वसूली करण्यात येईल अशी तरतूद उपरोक्त अ.क्र.३ येथील दिनांक १ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयात विहित केलेली आहे.

चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या कालावधीमध्ये कार्यान्वित असलेल्या अनुक्रमे कालबध्द पदोन्नती योजना व सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये यथास्थिती नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांकडून दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही अशी तरतूद आहे तथापि सहाव्या वेतन आयोगाच्या कालावधीमध्ये कार्यान्वित झालेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत दिलेल्या पहिल्या व दुसऱ्या लाभांची वसूली करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. ही वसूलीची तरतूद काढून घेण्यात यावी किंवा कसे ? याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात पुढीलप्रमाणे शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

शुध्दीपत्रक -

३. "या योजनेखाली पहिला/ दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, अशा लाभांची वसूली करण्यात येईल. सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहील" **ऐवजी** पुढीलप्रमाणे वाचावे -

**३. या योजनेखाली पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.**

**हे शुध्दीपत्रक या आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल.**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२२३१४४९३०१००५ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Zamir Ahmed Shaikh

Digitally signed by Zamir Ahmed Shaikh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Zamir Ahmed Shaikh
Date: 2015.12.23 14:50:56 +05'30'

**( ज.अ.शेख )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
७. सचिव, मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
११. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१३. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
१६. आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : एफएसटी-०४/१६/प्र.क्र.१२७/फ-४
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०६ मे, २०१६.

प्रति,

मुख्य सादरकर्ता अधिकारी,
मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,
मुंबई.

विषय :- मूळ अर्ज क्रमांक १९४/२०१६
श्री.सी.जे.कांबळे व इतर
विरुध्द
महाराष्ट्र शासन

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून वित्त विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-

"वित्त विभागाच्या शुध्दीपत्रकाप्रमाणे (दिनांक २३.१२.२०१५) तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वसूली करता येत नाही, मात्र दिलेले लाभ हे काढून घेता येतील."

२. वित्त विभागाच्या उपरोक्त अभिप्रायानुसार प्रस्तुत प्रकरणी याचिकाकर्त्यांकडून वसूली करण्यात येऊ नये, असे संबंधितांना निदेश देण्यात येत आहेत.

३. कृपया ही बाब मा.न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(आत्माराम लुडबे)
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर.
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कोल्हापूर.